# अनुक्रमणिका

संपादकीय २
पाणीवाली अंजिरा ४
गणवठा ७
बापूजींचा जनता राज्यात फेरफटका ९
देवरठा – अशी पालखी सुरेख बाई‌ं| म्हायारी धाडावी १४
अशिक्षित स्त्रियांपुढील आव्हान १६
रुपेरी पडद्यावरील कळसूत्री बाहुल्या १७
: ३२ कोटीची नवी मशिनरी म्हणजे आम्हा बायकांचे मरण, ' पण तुळसाबाई १९
अंधारातील ठिणग्या २३
जागृती ३१
सोलापूर कम्यून ३५
पंटर ३७
सुंदर, स्वच्छ पुण्याच्या सफाई कामगार दलितातील एकीचे व लढाऊपणाचे प्रतीक ४१
सौदा ४४
काळा दिवस ४७
आपल्या बाळाची काळजी आपण कशी घेऊ ४९
घासनाला ५३
व्हिएटनामी स्त्री, काल आणि आज ५५
जाहीर कर, जाहीर कर ६४
कै. ताराबाई शिंदेकृत ' स्त्रीपुरुष-तुलना' ६५
' बायजा ' कशी असावी वाचकांचे विचार ७०

# बायजा

वर्ष १

१९७७

अंक : ५ – ६

संपादक

सौदामिनी राव

कार्यालय

९७, प्रभात रस्ता, पुणे ४

---

- लेखकांच्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

- पत्रिकेच्या या अंकासाठी वापरलेला दरात उपलब्ध कागद महाराष्ट्र राज्य शिक्षण खात्याने सवलतीच्या करून दिलेला आहे.

---

editorial

# संपादकीय

'बायजा'च्या पहिल्या वर्षाचा शेवटचा अंक वाचकांच्या हाती देताना आम्हाला विशेष आनंद होत आहे.

पहिले वर्ष हे परिणामाच्यादृष्टीने संमिश्र स्वरुपाचे ठरले. काहीसे यश. काहीसे अपयश. आधीच साहित्याचा एवढा पसारा वाढलेला. एखादे नवीन नियतकालीक, विशेषत. वैचारिक स्वरुपाचे, सुरू करावयाचे म्हणजे अडथळ्याची शर्यतच. गंभीर स्वरूपाचे वाचन करण्याची आवड असणारा वाचकवर्ग मिळविणे व वाढवणे, पैशाची तरतूद करणे, चांगले लेखन मिळविणे, वेळेवर छपाई घडवून आणणे सारेच परीक्षा घेणारे प्रश्न. या अडचणींना तोंड देत शेवटच्या अंकापर्यंत आपण पोहोचू की नाही अशा साशंक स्थितीत आम्ही असतानाच हळूहळू शेवटच्या अंकापर्यंत पोहोचलो व तो अंक वाचकांच्या हातात देऊ शकलो. सहाजिकच आत्मविश्वास दुणावला, हुरुप चढला.

'बायजा'चा पहिला अंक 'दारुबाजी'वरचा होता. दारुबाजी का वाढते व त्यातून सुटका करून घेण्यासाठी काय करता येईल याचे विवेचन त्यात होते. दुसरा अंक 'शिक्षण'विषयक होता. शिक्षणाची उद्दिष्टे, पद्धती आणि इतर शिक्षणविषयक प्रश्न त्यात चर्चिले होते. तिसरा अंक स्त्री–रोजगार व आर्थिक स्वातंत्र्य या विषयाला प्राधान्य देणारा होता. स्त्रीमुक्ती आणि स्त्री-उन्नतीसाठी आर्थिक स्वातंत्र्याची आवश्यकता, त्यात येणाऱ्या अडचणी आणि त्यांना तोंड देण्याची स्त्रीची धडपड या गोष्टींचा त्यात उहापोह होता. चौथा अंक 'दलितांच्या समस्या' या विषयावर होता. दलितांच्या प्रश्नाचे स्वरूप, दलितांवर होणारे अन्याय, दलित आंदोलन वगैरे विषयांवर त्यात चर्चा होती.

आणि आता हा पाचवा आणि साहावा असा जोड अंक आहे. कामगार, कष्टकरी स्त्रियांच्या प्रश्नांवर भर देणारा. आर्थिक दुर्बलतेचा फायदा घेऊन स्त्रियांवर जमीनदारांकडून, सावकारांकडून अगर गावातील अन्य वजनदार मंडळींकडुन अत्याचार केले जातात. त्या पायी 'काळा दिन'मधील जमनासारख्या किंवा 'अंधारातील ठिणग्या'मधील नकुशीसारख्या स्त्रिया बळी जातात. त्याच कारणास्तव मिरजेमध्ये अरबांना स्त्रिया अप्रत्यक्षपणे विकल्या जातात. त्यांचा सौदा होतो. अर्थात घडतंय खरं ! काय करायचं ! असे म्हणून स्त्रिया गिळून गप्प बसताहेत असे नव्हे. प्राप्त परिस्थितीला मूकपणे शरण जाऊन चालणार नाही हे स्त्रीला उमगलं आहे. म्हणूनच आपल्या विहिरीत सवर्णांनी मेलेले कुत्रे टाकले याचा प्रतिकार करण्यासाठी 'पाणीवाली अंजिरा' ही दलित स्त्री इतरांना प्रवृत्त करते व सवर्णांच्या विहिरीवर जाऊन सर्वजणी पाणी भरतात. पुण्याच्या सफाई कामगार वेणूबाई व ताराबाई या दीर्घकाळ झगडा करणाऱ्या व पुढारीपण करणाऱ्या दलित स्त्रियांचे प्रतिनिधित्व करताहेत. जळत्या चितेमधून पसार होणारी नकुशी आपल्यावरील अन्यायाचा सूड अत्याचार करणाऱ्या पाटलाचा खून करून घेते. 'जागृती' नाटिकेतील सरला कामगार युनियनची आवश्यकता समजून घेऊ लागलीय. तर तुळसाबाईसारखी कापडगिरणीमधील अशिक्षित कामगार स्त्रीही पुरुषांच्याबरोबरीने संपात आणि कामगार युनियनच्या चळवळीत भाग घेऊ लागली आहे.

आम्हाला जाणीव आहे की अंजिरा, नकुशी अगर तुळसाबाई या आजच्या प्रातिनिधिक स्त्रिया नाहीत कदाचित ही अपवादात्मक उदाहरणे ठरतील. पण आज ना उद्या अशा स्त्रिया सार्वत्रिक बनणार आहेत. नव्हे त्यासाठीच हा सारा खटाटोप आहे. चार भिंतीच्या आत वावरणारी, आर्थिकदृष्टचा परावलंबी, अंधश्रद्धाळू, परिस्थितीपुढे अगतिक बनणारी, नाजूक आणि भित्री, असे जे स्त्रीचे पारंपारिक चित्र जनमानसात चितारलं गेलेलं आहे ते हळूहळू विरत आहे. ते जितक्या झपाटचाने विरून जाईल तेवढी स्त्रीची उन्नती वेगाने होईल. नवीन स्त्री निर्माण होण्यास मदत होईल. हा बदल घडवून आणण्याच्या प्रक्रियेस हातभार लावण्याचा प्रयत्न 'बायजा' आपल्या परीने करीत आहे. त्याचप्रमाणे इतर हितचिंतकांकडून दाखविल्या गेलेल्या व आम्हाला जाणवलेल्या उणिवांची आम्ही दखल घेण्याची निश्चित काळजी घेऊ. सर्व थरातील ग्रामीण, शहरी विभागातील स्त्रियांचे प्रश्न मांडत असताना प्रत्यक्ष जीवनानुभवाच्या संदर्भात ते मांडण्याचे भान राखणे आम्ही महत्त्वाचे मानतो. हा प्रयत्न यशस्वी

[illegible]साठी वाचकांचा प्रतिसाद बहुमोल ठरेल.

'बायजा'च्या वाचकांच्या, चाहत्यांच्या आणि हितचिंतकांच्या सूचना लक्षात घेऊन पुढील वर्षी 'बायजा'चे स्वरूप थोडे बदलायचे आम्ही ठरविले आहे. केवळ एका विषयाला वाहिलेला अंक न काढता विविध विषयांवर लेख असलेला व सामान्य वाचकांना आवडतील अशी विविध सदरे असणारा अंक काढावा असा विचार आहे. स्त्रीविषयक कोणते कायदे झाले आहेत व त्यांची प्रत्यक्षात अंमलबजावणी करताना कोणते अनुभव व अडचणी येतात? आपल्या समाजातील प्रचलीत चालीरीती व रुढी कोणत्या परिस्थितीत निर्माण झाल्या आणि बदलत्या परिस्थितीत त्यात कसा बदल घडवून आणायला पाहिजे? शिक्षिका, नर्स, विडीकामगार आणि इतर व्यवसायातील स्त्रियांच्या प्रश्नांचे स्वरूप कसे आहे आणि ते प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी कोणते प्रयत्न केले आहेत? दलित, आदिवासी, कनिष्ट वर्गातील स्त्रिया परिस्थितीला कशातऱ्हेने तोंड देत आहेत? साहित्यात, नाटकात, सिनेमात, स्त्रीचे चित्रण कशा पद्धतीने केले जाते व त्याचे काय परिणाम संभवतात हे व अशासारखे विविध विषय पुढील अंकांमध्ये हाताळण्याचा विचार आहे. पुढील अंक वाचकांच्या पसंतीला उतरतील असा विश्वास आम्हाला वाटतो. वाचकांनीही वेळोवेळी पत्रे लिहून आपल्या 'बायजा'विषयीच्या अपेक्षा कळवून आमच्या कार्यात आम्हाला मार्गदर्शन करावे अशी त्यांना नम्र विनंती आहे.

स्त्री, विशाल सह्याद्री, केसरी, वज्राघात, साप्ताहिक चौफेर, लोकमत व इतर वर्तमानपत्रांनी व नियतकालिकांनी 'बायजा'चे नाव वाचकांपर्यंत पोचविण्याचे महत्त्वाचे काम करून आम्हाला साहाय्य केले याबद्दल आम्ही कृतज्ञ आहोत. यापुढेही त्यांचे असेच सहकार्य लाभेल अशी आशा करतो. त्याचप्रमाणे वाचकानीही 'बायजा'चे उत्साहपूर्ण स्वागत करून आम्हाला आमच्या उपक्रमात उत्साह प्राप्त करून दिला त्याबद्दल आम्ही त्यांचे मनःपूर्वक आभारी आहोत. पोष्टात अंक गहाळझाल्यामुळे काही वर्गणीदारांना आमचे अंक पोहोचू शकले नाहीत त्याबद्दल आम्ही अत्यंत दिलगीर आहोत. कृपया वर्गणीदारांनी गैरसमज करून घेऊ नये. अंक मिळाला नाही असे वाटल्यास आम्हाला पत्र लिहून कळवावे. परत दुसरी प्रत पाठविण्याची आम्ही जरूर व्यवस्था करू.

आता वाचकांची आणि 'बायजा'ची भेट जानेवारी १९७८ मध्ये. तेव्हा 'बायजा'च्या वाचकांना आणि हितचिंतकांना नूतन वर्ष सुखाचे, समृद्धीचे व भरभराटीचे जावो ही 'बायजा'तर्फे शुभेच्छा.

**— संपादक**

---

★ 'बायजा' द्वैमासिकाची १९७८ ची वार्षिक वर्गणी त्वरीत पाठवावी ही विनंती.

★ १९७८ ची वार्षिक वर्गणी : एकूण सात रुपये (टपाल खर्चासह)

★ पत्रव्यवहाराचा व वर्गणी पाठविण्याचा पत्ता –
सौदामिनी राव, संपादक 'बायजा', ९७ प्रभात रस्ता, पुणे ४

१९७७ सालात प्रसिद्ध झालेले आपल्या जिव्हाळ्याच्या विषयावरील खास अंक आपण वाचले नसतील तर त्वरीत मागवा ( अंकाच्या मर्यादितच प्रती शिल्लक आहेत. )

अंक – १ – दारूबाजी : एक सामाजिक समस्या
अंक – २ – शिक्षण : काही प्रश्न – कोणाचे ? कोणते ? कशासाठी ?
अंक – ३ – स्त्रीचे आर्थिक स्थान
अंक – ४ – दलितांच्या समस्या

अंक वाचावा व प्रतिक्रीया कळवावी ही विनंती.

---

विशेष सूचना : 'दलितांच्या समस्या' या चौथ्या अंकामध्ये नयना कुलकर्णी यांच्या लेखाचे शीर्षक 'आम्ही माणसासारखं जगायला मागतो' असे होते. ते अनुक्रमणिकेत चुकीने 'नामगावमधील जातीयवादाचा पगडा' असे पडले आहे. त्याबद्दल आम्ही दिलगीर आहोत.